ISSN : 0974-3065

**प्रथम अंक**

# इतिहास दर्पण
# ITIHAS DARPAN

विक्रमाब्ध २०७९, युगांब्ध ५१२४
जानेवारी २०२२

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना की शोध पत्रिका
आपटे भवन, केशव कुंज, झंडेवाला, नई दिल्ली - ११० ०५५
RESEARCH JOURNAL OF AKHIL BHARTIYA ITIHAS SANKALAN YOJANA
Apte Bhawan, Keshav Kunj, Jhandewala, New Delhi - 110 055

Scanned by CamScanner

# अखिल भारतीय इतिहास संकलन योजना
## इतिहास दर्पण
## (यू.जी.सी. मानदण्ड)

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना भारतीय इतिहास और संस्कृति के क्षेत्र में कार्यरत राष्ट्रीय और अंतर्राष्ट्रीय विद्वतजनों का एक राष्ट्रव्यापी संगठन है जो भारतीय इतिहास, संस्कृति और परम्परा आदि के क्षेत्र में प्रमाणिक, तथ्यपरक तथा सर्वमान्य इतिहास लेखन तथा प्रकाशन की दिशा में कार्यरत है। भारतीय इतिहास में हो रहे नए-नए अनुसंधान और बदलते आयामों को समझने- समझाने हेतु योजना निरंतर संगोष्ठियों, परिचर्चाओं एवं विशेष व्याख्यानों का आयोजन देश के विभिन्न क्षेत्रों में करती रहती है। योजना इतिहास में हो रहे नए-नए अनुसंधानों और शिक्षा के जगत में उभर रहे नये-नये आयामों को प्रकाशित करने हेतु एक अर्धवार्षिक पत्रिका का प्रकाशन " इतिहास दर्पण" के नाम से करती है। इतिहास दर्पण देश - विदेश के प्रतिष्ठित संस्थानों और व्यक्तियों द्वारा सब्सक्राइब की जाती है। इतिहास दर्पण के प्रत्येक अंक ISSN 0974-3065 नंबर से प्रकाशित किया जाता है।

**पत्रिका का नाम :** इतिहास दर्पण

**ISSN नंबर :** इतिहास दर्पण का प्रत्येक अंक ISSN के साथ प्रकाशित किया जाता है।

**प्रकाशन का स्वरुप :** इतिहास दर्पण अर्द्धवार्षिक पत्रिका है जो वर्ष में दो बार नियमित रूप से प्रकाशित की जाती है। इसमें देश-विदेश के विभिन्न विद्वानों व शोधकर्ताओं से शोध पत्र आमंत्रित कर प्रकाशन से पूर्व उनका विधिवत समीक्षा (पीअर रिव्यु) कराया जाता है। यह पत्रिका मूलत: *हार्ड फॉर्म* तथा बाद में पी. डी. एफ. की जाती है।

**काल-चक्र :** यह वर्ष में दो बार प्रकाशित की जाती है ।

**प्रकाशक, शहर और राष्ट्र:** इतिहास दर्पण, अखिल भारतीय इतिहास संकलन योजना द्वारा प्रकाशित की जाती है । इसका मुख्यालय नई दिल्ली, भारत में स्थापित है।

**मानदंड/क्राइटेरिया :** इतिहास दर्पण के लिए इतिहास संकलन योजना की वेबसाइट http://www.abisy.org/ के अंतर्गत एक पृथक वेब लिंक है जहां इतिहास दर्पण से सम्बंधित सभी जानकारी उपलब्ध है।

Scanned by CamScanner

**विधिवत समीक्षा (पीअर रिव्यू) :** अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, इतिहास दर्पण में प्रकाशित होने वाले लेखों का प्रकाशन से पूर्व विधिवत समीक्षा (पीअर रिव्यू) करने की नीति पर अमल करती है। समीक्षा समिति प्रत्येक लेख में प्रकाशन सम्बन्धी मानकों को निर्धारित करने में महत्वपूर्ण भूमिका अदा करती है। इतिहास संकलन योजना के पास जब कोई शोध पत्र आता है तो सबसे पहले इतिहास संकलन योजना के अंतर्गत बनी प्रकाशन सम्बन्धी समिति प्राथमिक तौर पर शोध पत्रों का चुनाव करती है। इसके पश्चात् प्रत्येक लेख/शोध पत्र को विशेषज्ञ की समीक्षा के लिए भेजा जाता है। विशेषज्ञ द्वारा अन्य पक्षों के साथ–साथ यह भी देखा जाता है कि लेख की विषय वस्तु मौलिक है तथा शोध प्रविधि दुरुस्त और वैज्ञानिक है। विशेषज्ञ के सुझावों और टीका-टिप्पणी के साथ वापस आने पर लेख को लेखक के परिमार्जन और अनुमोदन के लिए भेजा जाता है। लेखक के अनुमोदन के बाद ही प्रकाशन की प्रक्रिया को अंतिम रूप देने की ओर अग्रसर किया जाता है।

**आचार–नीति (Ethics Policy) :** इतिहास संकलन समिति निम्नलिखित आचार-सहिंता पर अमल करती है ।

- शोध पत्र मौलिक शोध पर आधारित होना चाहिए।
- रिसर्च के निष्कर्ष उस विषय पर उपलब्ध साहित्य में वृद्धि करता हो।
- शोध का उद्देश्य सम्बंधित विषय में आगे होने वाले अनुसंधान के लिए मार्ग प्रशस्त करना हो।

**डेटाबेस इंडेक्स : योजना इस हेतु प्रयासरत है।**

**नियमितता :** अखिल भारतीय इतिहास संकलन योजना नियमित रूप से वर्ष में दो बार “इतिहास दर्पण” का प्रकाशन करती है तथा अभी तक इस निरंतरता में कोई रूकावट नहीं आयी।

Scanned by CamScanner

 ISSN: 0974 3065

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोधनिबंधाचे नाव | लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ. सदाफुले डी. एल. | १ - ५ |
| २ | महाराष्ट्राचा कृषी विकास व यशवंतराव चव्हाण | डॉ. उर्मिला क्षीरसागर | ६ - १० |
| ३ | महाराष्ट्राच्या जडण-घडणीत महानुभाव पंथाचे योगदान | प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | ११ - १६ |
| ४ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील भालजी पेंढारकर यांचा सहभाग | प्रा. मनोज बबनराव देवकर | १७ - २० |
| ५ | महाराष्ट्रातील शेतकरी व कामगार चळवळ स्थितीचे आकलन | प्रा. सचिन गोवर्धन कांबळे | २१-२६ |
| ६ | महाराष्ट्रातील क्रांतीकारकांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | शेळके जगदीश भाऊसाहेब | २७-२९ |
| ७ | छत्रपती राजर्षीशाहूंचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य | प्रा. डॉ. गोर्डे व्ही. एस. | ३०-३५ |
| ८ | स्वातंत्र्य संग्राम काळातील खानदेशातील घडामोडी | रश्मी ( सरला भिरूड) | ३६-४१ |
| ९ | खानदेशातील सतीप्रथा : एक मीमांसा | प्रा. डॉ. आर. ए. चौधरी | ४२-४८ |
| १० | कंपनी सरकारकालीन खानदेशातील भिल्ल जमातींचा उठाव | प्रा. डॉ. आर. एस. पवार | ४९-५६ |
| ११ | महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | विष्णू रघुनाथ हेलुडे | ५७-६१ |
| १२ | कामगार चळवळीचे ऐतिहासिक अध्ययन | प्रा. डॉ. रामभाऊ देवराव काशीद | ६२-६६ |
| १३ | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतीकारकांचे योगदान | प्रा. राजकुमार ज्ञानोबा घाटे | ६७-७२ |
| १४ | सेनापती बापट यांचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | अशोक गीताराम काळे | ७३-७७ |
| १५ | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सत्यशोधकीय मराठी नियतकालिकांची भूमिका | योगेश ज्ञानेश्वर शिंदे | ७८-८२ |
| १६ | महाराष्ट्रातील इंग्रजी प्रशासकीय स्थैर्य प्राप्तीतील एलफिन्स्टन याची भुमिका | डॉ. भामे गणेश पंढरीनाथ | ८३-८८ |


Scanned by CamScanner

 ISSN: 0974 3065



| | | | |
|---|---|---|---|
| १७ | जंगल सत्याग्रह :- सविनय कायदेभंग आंदोलनातील पर्व | लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव | ८९-९३ |
| १८ | महाराष्ट्रातील धार्मिक, सामाजिक संस्था व व्यक्तींचे योगदान | प्रा. नंदू रामभाऊ जगदाळे | ९४-९९ |
| १९ | स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकरी चळवळी | प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे | १००-१०५ |
| २० | लोकमान्य टिळकांची भारतीय राष्ट्रवादाच्या जडणघडणीत वैचारिक भूमिका | डॉ. अभिलाषा राऊत | १०६-१११ |
| २१ | भारतीय स्वातंत्र चळवळीत महाराष्ट्रातील महिलांचे योगदान | डॉ. राजाराम रा पिंपळपल्ले | ११२-११६ |
| २२ | गोवा मुक्ती चळवळ आणि अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्ष | डॉ. विधाटे गणेश शंकर | ११७-१२५ |
| २३ | महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | डॉ. अमोल गंगणे | १२६-१३० |
| २४ | हैद्राबाद मुक्ती संग्रामात स्त्रीयांचे योगदान | प्रा.राजश्री गुणाजीराव भोपाळे | १३१-१४० |
| २५ | श्री क्षेत्र नारायण गडावरील संतांच्या धार्मिक कार्याचा आढावा | राजकुमार सोनलाल जानवळे | १४१-१४६ |
| २६ | शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक आणि महाराष्ट्रातील पूर्वप्राथमिक शिक्षण चळवळ | डॉ. श्रीमती सरोदे स्वाती रामराव | १४७-१५४ |
| २७ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील शेतकरी आणि कामगारांचे योगदान | श्री.भाऊराव महादेव देवकाते | १५५-१६३ |
| २८ | ब्रिटीशकालीन शेतकरी आंदोलन : एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप | प्रा. साळवे एस. आर. | १६४-१६९ |
| २९ | भारतीय स्वतंत्रता आंदोलनातील अवंतिकाबाई गोखले यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा. मृणाल गुलाबराव भोसले | १७०-१७५ |
| ३० | क्रांतिकारी चळवळीचे भारतीय स्वतंत्रता आंदोलनातील योगदान | प्रा. डॉ. नारायण कारभारी म्हस्के | १७६-१८० |
| ३१ | १९३८ चा सत्याग्रह व परभणी जिल्हा | प्रा. डॉ. उध्दव उमाजी राऊत | १८१-१८३ |
| ३२ | १८५७ चे स्वातंत्र्यसमर आणि महाराष्ट्र | प्रा. शिंदे ज्योती अर्जुन | १८४-१९० |
| ३३ | हरताळ, मीठाचा सत्याग्रह आणि जंगल सत्याग्रह चळवळीत पूर्व खानदेशाचा सहभाग - एक दृष्टीक्षेप | डॉ. रमेश धनराज जाधव | १९१-१९९ |
| ३४ | आद्यक्रांतिकारक उमाजीराजे नाईक यांचे | डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी | २००-२०३ |



Scanned by CamScanner

 ISSN: 0974-3065

# जंगल सत्याग्रह :- सविनय कायदेभंग आंदोलनातील पर्व

लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराय
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
कळंब,ता.कळंब,जी.उस्मानाबाद.
मो.न.9970798803,9767939000.
Emil ID haribhaupawde123@gmail.com

**प्रस्तावना :-**

ब्रिटिशांच्या जोखडातून भारतीयांची मुक्तता करण्यासाठी भारतात स्वातंत्र्य चळवळीचा आरंभ प्रारंभापासून झाला होता.या स्वातंत्र्य चळवळीचे प्रामुख्याने तीन कालखंड पडले जातात ,यामध्ये मवाळ,जहाल व गांधीयुग, या शिवाय क्रांतिकारकांच्या कार्याचाही उल्लेख प्रामुख्याने केला जातो.या स्वातंत्र्य चळवळीला लोकभिमुख बनविण्याचे, श्रेय हे महात्मा गांधी यांना दिले जाते. साधारणपणे 1920 सालच्या आसपास भारतीय स्वातंत्र्य चळवळीला महात्मा गांधी च्या रुपाने,विचाराने एक नवी दिशा मिळाली.व चळवळीला गती प्राप्त झाली. महात्मा गांधींनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध अहिंसक आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने लोकसहभागाला महत्त्व दिले होते.याचे फलित म्हणजे 1920 सली महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्यासाठी जी आंदोलन उभारले गेले,त्याला भारतातील सर्वच घटकांनी उस्फूर्तपणे पाठिंबा देऊन असहकार आंदोलनात सहभाग नोंदविला. गांधीने.या आंदोलनातून ब्रिटीश सत्तेल एक धक्काच दिला. पुढे गांधीने जे सविनय कायदेभंग आंदोलन उभे केले.ते भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वपूर्णआंदोलन होते.भारतीयांवर ब्रिटिशांनी जी जुलमी,अत्याचारी ,आर्थिक शोषण करणारी व्यवस्था लादली होती. त्या विरोधात जी लोक भावना तयार झाली होती.त्याला वाचा फोडण्यासाठी 1930 साली मिठाचा कायदा मोडून सविनय कायदे भंग आंदोलनाला सुरुवात केली. याच आंदोलनात, भारतातील सर्व घटकांनी सक्रिय सहभाग घेतला. महाराष्ट्रातून या आंदोलनाला भरपूर पाठिंबा मिळाला.या आंदोलनादरम्यान जंगल सत्याग्रह आंदोलन लोकांनी उभारुन ब्रिटिश सरकारचे जंगल विषयक जे अन्याय करणारे कायदे होते.त्या विरुद्ध आवाज उठविला.या जंगल सत्याग्रहत सर्वांनी सहभाग नोंदवून शौर्य दाखविले होते. याचा परामर्श 'जंगल सत्याग्रह:- सविनय कायदेभंग आंदोलनातील पर्व ' या शीर्षकाखाली प्रस्तुत शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**जंगल सत्याग्रह :-**

Scanned by CamScanner

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखल्या जातो भारतातील जास्तीत जास्त लोकसमूह हा ग्रामीण भागात वास्तव्याला आहे. या ग्रामीण भागात राहणाऱ्या लोक समूहाला जगण्यासाठी , उदरनिर्वाहासाठी जमीन (शेती) जनावरे (पशुपक्षी) आणि जंगल (वनसंपदा) यातील जकारांची आवश्यकता असते. परंतु ब्रिटिशसत्ता दिशांकडून सन 18660 मध्ये जंगलावर नियंत्रण आणण्यासाठी अनेक बंधने घालावयास सुरुवात केली. मुख्य मोठे जंगले आणि छोटी जंगले अशी जंगलांची विभागणी करण्यात आली होती.तसेच ब्रिटिश शासना कडून आरक्षित करण्यात आलेल्या,जंगलात लोकांना गुरे चारण्या,झाडे तोडण्यास किंवा जनावरा साठी लागणारे गवत कापण्यास ,सक्त मनाई करण्यात आली होती. त्यामुळे विशेषता आदिवासी व जंगल परिसरात स्थानिक लोक समूहाला जाळण्यासाठी लाकूड, झाडांची वेगवेगळी फळे, औषधी वनस्पती अशा विविध लागणाऱ्या व अर्थार्जन करण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या गोष्टी, वनसंरक्षकाची नजर चुकवून गोळा कराव्या लागत होत्या.या शासनाच्या जंगल संबंधीच्या कायद्यातील जाचक अटी, तरतुदीबद्दल लोकांमध्ये असंतोष पसरला होता. या असंतोषाला खऱ्या अर्थाने वाट मिळाली ती सविनय कायदे भंग आंदोलन दरम्यान. 1930च्या जुलैपासून मिठ कायद्याच्या विरोधा, प्रमाणे जंगल संबंधीचे कायदे मोडून सत्याग्रहाची मोहीम हाती घेण्याचा निर्णय झाला होता[१].या सत्याग्रहाचे स्वरूप जंगलाविषयी ब्रिटिशांनी जी कायदे केली होती ते कायदेभंग करून, जंगलातील झाडे तोडणे ,आरक्षित जंगलात प्रवेश करणे होते. या सत्याग्रहासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीचे मुख्य कार्यालय अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर व अकोल हे तालुके योग्य आहेत असे समितीला वाटले होते. त्यामुळे या समितीचे मुख्य कार्यालय संघनेर येथे ठेवण्यात आले होते. रामकृष्ण,महाराज,लालजी पेंडसे,व श्रीपाद शंकर ,नवरे हे या जंगल सत्याग्रहाचे सूत्रधार म्हणून पुढे आले होते.[२]

सविनय कायदेभंग आंदोलनात मिठाचा कायदा मोडण्यासाठी जो सत्याग्रहाचा मार्ग अवलंबिला गेला. त्याप्रमाणे जंगल विषयक कायदे मोडण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबण्याचे ठरले.जंगल सत्याग्रहातील एक गाजलेले ठिकाण म्हणजे चिरनेर हे ठिकाण रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील एक गाव आहे. या गावा व परिसरातील आदिवासी, शेतकरी हे मोठ्या प्रमाणात पारंपरिक शेती कसत होते, व जंगली संपदेच्या सहायने हे लोक आपले जीवन जगत होते परंतु ब्रिटिशांनी जंगल विषयक जे कायदे केले होते,त्याला विरोध म्हणून 25 सप्टेंबर 1930 रोजी इंग्रज राजवटी विरोध चिरनेर सह काळेबुसरे, मोठी,जुई,कोप्रोली, सोपटे, पाणदिवे,भोग, धाकटी, विंधणे, दिघोडे आदी गावातील लोकांनी जंगलातील लाकडे तोडण्यास इंग्रज शासनाने विरोध केल्याने, शेतकरी, कातकरी वर्गाने कात्र्या, कोयते, कुऱ्हाड, विळा, आदी लाकडी ,लोखंडी अवजारे हातात घेऊन ,इंग्रजांचा जंगल कायदा मोडून ,जंगल सत्याग्रह घडवून आणला. या सत्याग्रह दरम्यान लोक घराघरातून रस्त्यावर आले होते.[३] चिरनेर व परिसरामधील लोकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता,जंगल सत्याग्रह करून इंग्रजांनी जंगल विषयक जी कायदे केली होती, त्या प्रति आपला रोष व्यक्त केला. या आंदोलनादरम्यान पनवेलच्या विमल

Scanned by CamScanner

ISSN: 0974-3065

गुप्ता यांनी स्वतः नेतृत्व करत,स्त्रियांचे एक पथक चिरनेर च्या जंगलात सत्याग्रहासाठी नेले होते. या आंदोलनादरम्यान इंग्रज सरकारकडून गोळीबार करण्यात आला होता. या गोळीबारात 7 आंदोलक सत्याग्रहीने स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले होते.या घटनेमुळे आंदोलनादरम्यान धुमश्चक्री होऊन एक वनरक्षक आणि तीन पोलीस कर्मचारीही ठार झाले होते.या चौघांच्या खूणाबद्दल व दंगल घडविणे दरोडा घलने,यासारखे आंदोलकानवर गुन्हे दाखल करून,आंदोलकांना अटक करण्यात आली होती.त्यावेळी या अटक करण्यात आलेल्या सत्याग्रहींच्या खटल्यात मदत करणाऱ्यांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते.[४] पुढे हा खटला मागे घेण्यात यावा यासाठी खूप प्रयत्न करण्यात आले. त्यांचीचे फलित म्हणून मुंबई सरकारने 4 डिसेंबर 1929 रोजी सर्वांना माफ केल्याने चिरनेर प्रकरणावर पडदा पडला. त्याचप्रमाणे सातारा जिल्ह्याने ही जंगल सत्याग्रहात छाप उमटविली होती.या जंगल सत्याग्रहात जिल्ह्यातील स्त्री-पुरुषांनी शौर्य गाजविले. जिल्ह्यातील बिळाशी गावाने जंगल सत्याग्रहात सहभागी होऊन जंगल कायद्याचा भंग करून जंगलातून एक झाड तोडून आणले आणि गावातील मर चौकात उभे केले. याची चाहूल पोलिसांना लागताच पोलिसांनी गावात शिरूर हे आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान राजाबाई कदम नावाच्या स्त्रीला पोलिसांनी बेदम मारहाणकरत तिच्या हाती असलेला झेंडा खेचून घेण्याचा प्रयत्न केला.पण तिने तो झेंडा सोडला नाही.[५] या बिळाशी येथील सत्याग्रहाचे नेतृत्व करणाऱ्या चरणकरा सकट 39 लोकांची पोलिसाने धरपकड केली होती.

नाशिक जिल्ह्यात डांग हा तर जंगलाचा प्रदेश,तेथील वास्तव्याला असणारे कोळी आणि ठक्कर हे आदिवासी लोक जंगल सत्याग्रहात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले त्यामुळे ब्रिटिश शासनाकडून त्यांच्यावर जो वनचराई कर लादला होता.तो कर त्यांच्याकडून वसूल करणे त्या ठिकाणी असणाऱ्या सरकारी नोकरांना अवघड होऊन लागले. तेथे स्थानिक सशस्त्र पोलीसांचा ही धक वाटेनासा झाला. समशेरपुर हे गाव तर जंगल सत्याग्रहामुळे गाजले,जक्सिन खून खटल्यात दोषी ठरवल्यानंतर सावरकर बंधू बरोबर अंदमानात यमयातना भोगून आलेले वामन नारायण जोशी समशेरपूर येथे स्थायिक झाले होते. त्यांनाही या जंगल सत्याग्रहात सहभागी झाल्याचा आरोप ठेवून ब्रिटीशशासनाने त्याना अटक केले.[६] नाशिक जिल्ह्यातील सटाणा, बागलाण,कळवण ह्या तालुक्यातही जंगल सत्याग्रहाची व्याप्ती जास्त होती. बागलाणनातील सत्याग्रहाचे नेतृत्व दादासाहेब गद्रे,महंत, सितारामशास्त्री आणि लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी केले होते. त्यांना जंगल सत्याग्रहासाठी कारावासही भोगावा लागला होता. बागलाण येथील सत्याग्रहात सुमारे दोनशे स्त्रीयांनी सहभाग घेतला. तसेच या परिसरातील पकडलेल्या सत्याग्रहीना सोडण्यास भाग पाडण्यासाठी, टेंबा गावचा सुमारे 100 स्त्रियांनी पोलिसांना वेढा देऊन सत्याग्रहींना सोडण्यास भाग पाडले.[७]

पुसद जि.यवतमाळ येथेही जंगल सत्याग्रह झाला. या सत्याग्रह चे नेतृत्व बापूजी अणे यांनी केले होते.10 जुलै 1930 रोजी झालेल्या जंगल सत्याग्रहात 11 स्वयंसेवकांनी सहभाग



Scanned by CamScanner

नोंदविला,होता. तसेच विदर्भातील दुर्गाबाई जोशी, खोपडे प्रतिमा ताई ओक, यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व आदिवासी स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात सत्याग्रहात सहभाग घेतला होता.खानदेशात सहाशे लोकांनी जंगल सत्याग्रह केला होता .त्यांना अटकही केली गेली होती वर्धा जिल्ह्यातही सत्याग्रह झाले होते.[८] अशा प्रकारे मिठाचा कायदा आणि जंगल बद्दलचा कायदा मोडण्याच्या कार्यक्रमामुळे आधीच मंदीच्या लाटेमुळे गाजलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह आंदोलनात सहभाग घेतला,तसा आधीच्या चळवळीत कधीही घेतला नव्हता.[९]

सारांश :-

महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी सरकारविरोधी आंदोलने झाली त्यात सविनय कायदेभंग आंदोलनाचा उल्लेख महत्वपूर्ण आंदोलन म्हणून केल्या जातो. या आंदोना दरम्यान जंगल सत्याग्रह करण्यात आला. त्याला महाराष्ट्रत प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे दिसून येते. ब्रिटिश शासनाने वेगवेगळे कायदे करून स्थानिक लोकांना जंगल व जंगलातील साधन संपत्ती पासून दूर ठेवण्यासाठी जी कायदे केली होती. त्याविरोधात लोकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. तो जंगल सत्याग्रहाच्या रूपाने बाहेर पडला,जंगल सत्याग्रह कमी अधिक प्रमाणात महाराष्ट्राचा अनेक भागात झाला होता.या आंदोलनात शेतकरी, कष्टकरी ,स्त्री,पुरुष,आदिवासी,कोळी, जंगलावर उदरनिर्वाह करणाऱ्या लोक समूहाने या आंदोलनात सक्रीय सहभाग नोंदविला होता.थोडक्यात जंगल सत्याग्रह हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वपूर्ण लढा होता.

संदर्भसूची:-

1) य. दि. फडके :- विसाव्या शतकातील महाराष्ट्राचा राजकीय इतिहास 1930-39 ( खंड 4) श्रीविद्या प्रकाशन पुणे -1993 (पृ. क्र.69)

2) डॉ. अनिल कठारे :- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास(1819 ते 1960) विद्या बुक पब्लिशर्स, औरंगाबाद-2009 (पृ.क्र.426)

3) mr.m. Wikipedia org.

4) विजय आपटे :- शोध महाराष्ट्राचा राजहंस प्रकाशन, पुणे- 2016 (पृ क्र.489)

5) डॉ. एस एस गाठाळ :- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास(ई.स.1818-1960) कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद -2018 (पृ.क्र.348)

6) बॉम्बे प्रेसिडेन्सी पोलीस ॲबस्ट्रक्ट ऑफ इंटेलिजंन्स, 13 सप्टेंबर 1930 .

7] कार्यकारी संपादक सोमनाथ रोडे :- मराठवाडा इतिहास परिषद औरंगाबाद इतिहास संशोधन पत्रिका ,डिसेंबर 2017, (पृ.क्र.206)

8] उपरोक्त डॉ अनिल कठार:- आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (पृ.क्र.424)

9] उपरोक्त य.दि.फडके :- विसाव्या शतकातील महाराष्ट्र (पृ.क्र.70)

Scanned by CamScanner